# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

**निवडणुक महत्वाचे**

जा.क्र.रासनिप्रा/अर्हता दिनांक/ ५४५ /सन २०१४
दि.१०/१०/२०१४

**वाचावे :**१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ६ व नियम ९

**विषय : दि.३१/३/२०१३ अखेर निवडणुकीस पात्र असणाऱ्या सहकारी संस्थांच्या प्राथमिक मतदार यादीकरीता अर्हता दिनांक निश्चित करणेबाबत..**

## आदेश

ज्या अर्थी , महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (क) (ब) मधील तरतुदीनुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणावर सोपविलेली आहे,

ज्या अर्थी , महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब नुसार सहकारी संस्थांच्या समितीच्या समिती सदस्यांच्या रिक्त पदांची व पदाधिकारी यांची निवडणुक राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने घ्यावयाची आहे,

ज्या अर्थी सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी कलम ७३ कब नुसार शासन अधिसुचना सीएसएल २०१३/ प्र.क१२४/१५- सी दि.३०/३/२०१३ अन्वये राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण गठीत कले आहे,

ज्या अर्थी , महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब, दि.१२/९/२०१४ रोजी प्रसिध्द झालेल्या राजपत्रामध्ये दिनांक ११/९/२०१४ रोजीची महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ ची शासन अधिसुचना अधिसुचित होऊन त्या दिवसापासुन हे निवडणुक नियम अमलात आलेले आहेत,

ज्या अर्थी उक्त नमुद नियमान्वये सहकारी संस्थांच्या निवडणुका घेणे क्रमप्राप्त असुन या नियमान्वये सहकारी संस्थांच्या निवडणुकांकरीता संस्थांची प्राथमिक मतदार यादी तयार करण्यासाठी मतदार यादीचा अर्हता दिनांक निश्चित करणे आवश्यक आहे,

ज्या अर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ६ व ९ च्या तरतुदीनुसार ज्या संस्थांच्या समितीची मुदत संपण्यापुर्वी निवडणुका होऊ शकल्या नाहीत अशा संस्थांच्या बाबतीत प्राथमिक मतदार यादीचा

अर्हता दिनांक राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास निश्चित करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास प्रदान केले आहेत,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ६ व ९ च्या तरतुदीनुसार ज्या सहकारी संस्थांवर प्राधिकृत अधिकारी अथवा प्रशासक नियुक्ती केले आहे अशा संस्थांच्या बाबतीत प्राथमिक मतदार यादीचा अर्हता दिनांक निश्चित करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास प्रदान केले आहेत,

त्याअर्थी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण खालील नमुद सहकारी संस्थांच्या समितीच्या निवडणुकीसाठी प्राथमिक मतदार यादीचा **अर्हता दिनांक** महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ६ व ९ चे तरतुदीनुसार **दि.३१/१०/२०१४ निश्चित करीत आहे.**

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ४ अन्वये

- **<u>'अ' प्रकार संस्था</u>**
  १. सर्व सहकारी साखर कारखाने
  २. सर्व सहकारी सुत गिरण्या
- **<u>'ब' प्रकार संस्था</u>**
  १. सर्व नागरी सहकारी बँका
  २. सर्व पगारदारांच्या सहकारी बँका
  ३. रुपये दहा लाख किंवा त्यापेक्षा जास्त वसुल भागभांडवल असणाऱ्या प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था व आदिवासी सहकारी पतसंस्था
  ४. रुपये एक कोटी किंवा त्यापेक्षा जास्त ठेवी असलेल्या, रुपये दहा लाख किंवा त्यापेक्षा जास्त वसुल भागभांडवल असणाऱ्या सहकारी पतसंस्था,
  ५. रुपये एक कोटी किंवा त्यापेक्षा जास्त वसुल भागभांडवल असलेल्या नोकरदारांच्या पतसंस्था
  ६. शासकीय सहाय्य असलेल्या साखर कारखाने वगळता इतर सहकारी प्रक्रीया संस्था
  ७. शासकीय सहाय्य असलेल्या सहकारी औद्योगिक संस्था व सहकारी औद्योगिक वसाहती,
  ८. सर्व जिल्हा किंवा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ
  ९. सर्व मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था
- **<u>'क' प्रकार संस्था</u>**
  १. रुपये दहा लाख पेक्षा कमी वसुल भागभांडवल असणाऱ्या प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था व आदिवासी सहकारी पतसंस्था,
  २. रुपये एक कोटी पेक्षा कमी ठेवी असलेल्या, रुपये दहा लाख किंवा त्यापेक्षा जास्त वसुल भागभांडवल असणाऱ्या सहकारी पतसंस्था,
  ३. रुपये एक कोटी पेक्षा कमी वसुल भागभांडवल असलेल्या नोकरदारांच्या पतसंस्था,

४. दोनशे किंवा त्यापेक्षा जास्त सभासद असलेल्या गृहनिर्माण संस्था,

५. सर्व प्राथमिक सहकारी संस्था

६. सर्व प्राथमिक दुग्ध, मत्स्य, वराह आणि पशुधन सहकारी संस्था

७. शासकीय सहाय्य नसलेल्या सहकारी औद्योगिक संस्था व सहकारी औद्योगिक वसाहती,

८. शासकीय सहाय्य नसलेल्या साखर कारखाने वगळता इतर सहकारी प्रक्रीया संस्था

९. सर्व प्राथमिक सहकारी पणन संस्था

१०. सर्व प्राथमिक विणकर (हातमाग व यंत्रमाग) सहकारी संस्था,

११. इतर कृषी सहकारी संस्था

१२. दोनशे किंवा पेक्षा जास्त सभासद असलेल्या सहकारी उपसा जलसिंचन आणि सहकारी पाणी वापर संस्था,

- **<u>'ड' प्रकार संस्था</u>**

१. दोनशे पेक्षा कमी सभासद असलेल्या गृहनिर्माण संस्था,

२. दोनशे पेक्षा कमी सभासद असलेल्या सहकारी उपसा जलसिंचन आणि सहकारी पाणी वापर संस्था,

३. सर्व मजुर/ जंगल कामगार सहकारी संस्था

४. इतर सर्व साधारण सहकारी संस्था.

वर नमुद केलेल्या अर्हता दिनांकास अनुसरुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ व संस्थेचे उपविधीतील/ तरतुदी यांचे अनुपालन करुन प्राथमिक मतदार यादी सदर वर्गातील संस्थांनी तयार कराव्यात.

**सदरचे आदेश हे मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, पुणे यांच्या निर्देशानुसार व मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे -१

**(डॉ. आनंद जोगदंड)** १०/१०
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

१. तालुका / वार्ड सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)
२. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व).
३. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

२/- त्यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या निवडणुकीस पात्र सहकारी संस्थांच्या निदर्शनास आणावे.

**प्रत सस्नेह रवाना** :- सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे